**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक १८ मार्च २०२४**

**<u>ठळक बातम्या</u>**

1. **राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांची मुंबईत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक संपन्न - नियमांचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन.**
2. **'आम्ही अडीच वर्षांत केलेली कामं जनतेसमोर आहे'- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं पत्रकार परिषदेत प्रतिपादन.**
3. **हिंगोली इथं कुटुंब संवाद दौऱ्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची विद्यमान सरकारवर टीका.**
4. **'स्वीप' कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेत मतदार नोंदणीसाठी जनजागृती.**
5. **नागपुरात उद्या वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट, आगामी काही तासात पूर्व विदर्भाच्या अनेक जिल्हयात वादळाची शक्यता.**

*****

**<u>निवडणूक रोखे</u>**

**निवडणूक रोख्यांच्या संदर्भातले सर्व तपशील ३ दिवसात जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज स्टेट बँकेला दिले. रोखे खरेदी करणारा आणि हे रोखे वठवणारा राजकीय पक्ष यांची माहिती उघड होईल असा रोख्यांचा क्रमांकही जाहीर करण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. या रोख्यांचे सर्व तपशील स्टेट बँकेला जाहीर करावे लागतील यात कुठलंही दुमत नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं आज स्पष्ट केलं. बँकेनं त्यांच्या ताब्यातील आणि ताब्यात असलेल्या निवडणूक रोख्यांचे सर्व तपशील उघड केले आहेत आणि कोणतेही तपशील लपवून ठेवलेले नाहीत, या संदर्भात शपथपत्र एसबीआयला देण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. एसबीआयकडून सर्व तपशील मिळाल्यानंतर निवडणूक आयोगानं तत्काळ आपल्या संकेतस्थळावर तपशील अपलोड करावा, असं न्यायालयानं म्हटले आहे.**

## मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

१८ व्या लोकसभा निवडणुकीसाठीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज मुंबईत मंत्रालय इथं नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. राज्यातील मतदानाचे वेळापत्रक, निवडणुकीसाठी विविध पातळ्यांवरची सज्जता याविषयीची सविस्तर माहिती राजकीय प्रतिनिधींना दिली गेली. निवडणूक प्रक्रिया, नामांकन प्रक्रिया, खर्च या विषयीच्या नियम आणि तरतुदींविषयी राजकीय प्रतिनिधींना सविस्तर मार्गदर्शनही केले. आपला उमेदवार कोणत्याही अडचणीत सापडू नये यासाठी राजकीय पक्षांनी नियमांचे काटेकोर पालन करत पुढे जावे असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले. या काळात राजकीय पक्षांना, निवडणूक यंत्रणेकडून अपेक्षित सहकार्य देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

## मुख्यमंत्री शिंदे पत्रकार परिषद

आम्ही अडीच वर्षांत केलेली कामं जनतेसमोर आहे. आधीच्या सरकारनं विकास कामांत निर्माण केलेले अडथळे आम्ही दूर केले. जनतेचा स्नेह आम्हाला लाभला असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. मंत्री शंभूराजे देसाई यांच्या निवासस्थानी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुपारी पत्रकार परिषद घेतली त्यावेळी ते बोलत होते. काल शिवाजी पार्क इथं झालेल्या विरोधकांच्या सभेवर टीकास्त्र सोडताना ते एक कौटुंबिक मिलन होतं, असं ते म्हणाले. विरोधक फक्त व्यक्ती द्वेष करतात. ते अजूनही पंतप्रधान पदाचा चेहरा देऊ शकले नाहीत. बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका आणि विचार पुढं नेण्यासाठी आम्ही त्यावेळी सत्तेतून बाहेर पडलो असही यावेळी त्यांनी सांगितलं.

## उद्धव ठाकरे

दरम्यान, हिंगोली इथं कुटुंब संवाद दौऱ्यात बोलताना शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी विद्यमान सरकारवर शरसंधान साधताना' आम्ही सत्तेचे भुकेले नाहीत. आम्ही जनतेची सेवा करणारे सेवक आहोत. तेव्हा आम्हाला लुबाडून राज्य करू नका' अशा शब्दांत टीका केली. शासकीय यंत्रणेचा वापर

करुन भाजप सरकार खंडणी जमा करत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. उद्धव ठाकरे उद्या सकाळी साडेअकरा वाजता उमरखेड इथं आणि दुपारी एक वाजता हदगाव इथं पदाधिकाऱ्यांसोबत संवाद मेळाव्यात सहभागी होणार आहे.

## चंद्रशेखर बावनकुळे

भारतीय जनता पार्टीच्या राज्यातील 97 हजार पेक्षा जास्त बूथ वर पंचायत ते संसदेपर्यंतचे लोकप्रतिनिधी जाणार असून प्रत्येकी दोन बुथला ते भेट देणार आहेत. या भेटीअंतर्गत 24 योजनांबद्दल, भाजप सरकारच्या उपलब्धी या मतदारांपर्यंत पोहोचवणार असल्याची माहिती आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर मध्ये 28 नंबरच्या बूथला भेट दिल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं आज आणि उद्या महायुतीच्या बैठका होणार असून, लवकरच सर्व जागा जाहीर होतील, अशी माहितीही त्यांनी दिली. काल इंडिया आघाडीच्या मुंबईत झालेल्या सभेवर यावेळी त्यांनी टीका केली.

## स्टार्टअप महाकुंभ

देशातल्या स्टार्ट अप्सना विविध प्रकारचे गुंतवणूकदार आणि संभाव्य कॉर्पोरेट भागीदार यांच्याशी जोडणाऱ्या तीन दिवसीय स्टार्ट अप महाकुंभला आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथ सुरुवात झाली. जेव्हा २०१६ साली देशात हा उपक्रम सुरु झाला तेव्हा स्टार्ट अप्सची संख्या ३०० होती आणि आता ती एक लाखावर जाऊन पोहोचली आहे, असं डी पी आय आय टी सचिव राजेश कुमार सिंह यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं. तसंच सर्व हितसंबंधियांची आकडेवारी असणारी भारत स्टार्ट अप इकोसिस्टिम रजिस्ट्री तयार केल्याचंही त्यांनी सांगितलं.

## ‘स्वीप’-मतदार जनजागृती

सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात ‘स्वीप’ कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिका मुख्यालय इथं मतदार नोंदणीसाठी जनजागृती करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात आज शेकडोंच्या संख्येत महिलांनी ‘मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीनं प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात उपायुक्त तथा समाजकल्याण अधिकारी डॉ. रंजना लाडे यांनी उपस्थितांना ‘मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीनं प्रतिज्ञा दिली. तसच मुख्यालयात लावण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर सेल्फी काढत ‘आम्ही ही ‘स्वीप’ मतदान साक्षरता कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करू अशी ग्वाही उपस्थितांनी दिली. यावेळी लोकसभा मतदारसंघामध्ये ७५ टक्के पेक्षा अधिक मतदानाचे ध्येय ठेवण्यात आलं असून, यासाठी "मिशन डिस्टिंगशन" सर्व मतदारांच्या सहभागातून यशस्वीपणे राबविण्यात येणार आहे. यात आपणही सहभागी व्हाव, सर्वांनी मतदान करण्याचा संकल्प करावा आणि इतरांना देखील मतदानासाठी प्रेरित कराव असं आवाहन उपायुक्त धामेचा यांनी यावेळी केलं. तसंच, नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांच्या नेतृत्वात देखील जिल्हा परिषदेच्या महिलांनी ही शपथ घेतली. सर्वसमावेशक लोकशाहीसाठी मतदान करून समाजाचं भविष्य घडविण्यासाठी हि चळवळ राबविण्यात आली.

## नॅशनल पीडब्ल्यूडी आयकॉन

निवडणूक आयोगाने पॅरा आर्चर आणि अर्जुन पुरस्कार विजेती शीतल देवी यांची नॅशनल पीडब्ल्यूडी आयकॉन म्हणून घोषणा केली आहे. भारतीय कर्णबधिर क्रिकेट असोसिएशन संघ तसंच दिल्ली आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन संघ यांच्यात दिल्लीतील प्रदर्शनीय क्रिकेट सामन्यात त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

**भुजबळ**

नाशिक जिल्हयातील एका जागेवर भाजपाने उमेदवार जाहीर केला असला तरी नाशिक लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादीचा दावा आहे, असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. आज नाशिक येथे माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपाने आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांना उमेदवारी दिली आहे. जिल्हयामध्ये भाजपचे सहा आमदार आहेत, त्यामुळे आता नाशिकची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाली पाहिजे यासाठी आग्रह असल्याचं भुजबळ म्हणाले.

**हवामान**

हवामान विभागानं महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगढमध्ये अनेक ठिकाणी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. गोंदिया आणि चंद्रपूर इथ आज आणि नागपूर, भंडारा, गोंदिया आणि अमरावती इथं उद्या वादळीवारा आणि गारपीटीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान काल रात्री नागपुरात वादळीवाऱ्यासह पाऊस झाल्यानं, वाहतूक आणि वीज वितरण व्यवस्थेवर ताण आला. दरम्यान, आगामी काही तासात यवतमाळ, नागपूर अमरावती, चंद्रपूर जिल्हयांतील काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह  हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आज वाशीम आणि ब्रह्मपुरी इथं सर्वाधिक ३९ अंश सेल्सियस इतक्या कमल तापमानाची नोंद करण्यात आली.

**डेंगू**

डेंग्यूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत असून या आजाराशी लढा देण्यासाठी सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचं मत केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव लाम चोंगोई स्वीटी चांगसान यांनी व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं आज झालेल्या डेंग्यू परिषदेत त्या बोलत होत्या. जनतेच्या आरोग्यसुरक्षा आणि नगरनियोजन विभागातल्या सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करून डेंग्यूच्या विरोधात लढले पाहिजे, असंही त्यांनी सांगितलं.

******